# फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशन तर्फे विधवा महिला शेतकऱ्यांचे सक्षमीकरण

उस्मानाबाद, १० जून,२०२३: फिनॉलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडची सीएसआर शाखा मुकुल माधव फाऊंडेशन (एमएमएफ) उस्मानाबादच्या रखरखीत भूमीत, जिथे दुष्काळ आणि शेतककऱ्यांच्या आत्महत्या यामुळे निराशेची छाया पडली आहे, विधवा महिला व शेतकर्यांचे सक्षमीकरण करून त्यांच्या जीवनात आशेचे किरण आणत आहे. सामाजिक उत्तरदायित्वाप्रती मनापासून बांधिलकी ठेवून, मुकुल माधव फाऊंडेशन (एमएमएफ) ने समाजाला भेडसावणारा संघर्ष कमी करण्यासाठी एक परिवर्तनात्मक प्रवास सुरू केला आहे.